दैनिक
बातम्यांचा राजा
जनप्रवास
सांगली । कोल्हापूर । सातारा
सांगली
पो.र.नं.SGL/25/2025/2027 RNI NO MAHMAR/2003/11365 मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ वर्ष-२४ अंक-२५ पाने-१० मूल्य रु. ५



बातम्यांचा राजा
जनप्रवास

# आदर्श कॉलेजमध्ये पालक-शिक्षक संवाद मेळावा

**जनप्रवास । विटा**

येथील आदर्श कॉलेजमध्ये पालक - शिक्षक संवाद मेळावा प्राचार्य डॉ.यु. के. मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. यावेळी विभागाचे समन्वयक प्रा. एस. जे.शिंदे, सदस्य प्रा. सनी काळे, प्रा. राहुल गलांडे, तसेच तुकाराम ढवळे, फैयाज नदाफ, भारती यादव, निर्मला सूर्यवंशी, रूपाली कटरे यांची प्रमुख उपस्थिती होती.




■ विटा : आदर्श कॉलेजमध्ये पालक - शिक्षक संवाद मेळावा प्राचार्य डॉ.यु. के. मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. मोहिते म्हणाले की विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीत अभ्यास जितका महत्वाचा आहे तितकाच पालक व शिक्षक यांच्यात योग्य संवाद महत्त्वाचा ठरतो. पालकांनी आपल्या पाल्याने कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर त्याच्या कॉलेजमधील उपस्थिती पासून ते विविध कोर्सेस व इतर करिअरच्या संधी काय आहेत याविषयी सुद्धा जागृत राहिले पाहिजे. तेव्हाच आपल्या पाल्याचे उज्वल भविष्य लवकर होणार आहे. पुढे ते म्हणाले की संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सदाशिवराव पाटील तसेच अध्यक्ष व शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य ॲड. वैभव पाटील यांनी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी - सुविधा व दर्जेदार शिक्षणासाठी सर्व ते प्रयत्न केले असून याचा फायदा सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.

यावेळी पालकांमधून फैयाज नदाफ यांनी मनोगत व्यक्त करत कॉलेजमधील शैक्षणिक वातावरणाबद्दल समाधान व्यक्त करत आभार मानले.

शिक्षकाच्या वतीने बोलताना डॉ. निवासराव वरेकर म्हणाले की, आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आलेख तपासणीसाठी पालकांनी वरचेवर कॉलेजमध्ये येणे आवश्यक असते. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या कॉलेज पैकी आदर्शने अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले अर्थात पालकांनी ज्या विश्वासाने आपल्या पाल्यांचा येथे प्रवेश घेतला तो विश्वास शिक्षकांच्यासाठी आत्मविश्वास निर्माण करत असतो. विद्यार्थिनींच्यामधून तनुश्री शिंदे हिने कॉलेजमध्ये मिळणाऱ्या सर्व सोयींबद्दल आभार व्यक्त केले. प्रास्ताविक या विभागाचे समन्वयक प्रा. शिंदे एस. जे. यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल कांबळे यांनी केले. आभार प्रा. सनी काळे यांनी मानले.



Adarsh College, Vita
Estd. 1999
Tal.Khanapur, Dist.Sangli

PRINCIPAL
Adarsh College, Vita
Tal-Khanapur, Dist-Sangli

Scanned with CamScanner